# परिशिष्ट - १ अ

**नमुना- १**

**( नियम १३ पहा )**

**************************************************************************************************************

**जिल्हाधिकारी, जिल्हा नंदुरबार यांचे कार्यालय**

**क्रमांक : ग्रापंवि/जिपपंसनि/कावि/५३५/२०२१ दिनांक २९/०६/२०२१**

महाराष्ट्र पंचायत समित्या (निर्वाचक गण आणि निवडणूक घेणे ) नियम, १९६२ मधील नियम १३, पोट-नियम (१) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन मी, **डॉ.राजेंद्र भारुड, जिल्हाधिकारी नंदुरबार, जिल्हा नंदुरबार** याद्वारे यासोबतच्या अनुसूचीच्या स्तंभ १ मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या निर्वाचक गणाकडून (यात यापुढे यांचा निर्देश **" संबंधित निर्वाचक गण"** असा करण्यात आलेला आहे.) केल्या जाणाऱ्या निवडणूकीच्या संबंधात, पुढीलप्रमाणे तारीख, वेळ व जागा निश्चित करीत आहेः

अ) संबंधित निर्वाचक गणांसमोर उक्त अनुसूचीच्या स्तंभ २ मध्ये, विनिर्दिष्ट करण्यात आलेली तारीख व वेळ ही संबंधित निर्वाचक गणांच्या संबंधातील नामनिर्देशन पत्रे सादर करण्यासाठी अखेरीची तारीख व वेळ असेल;

ब) उक्त अनुसूचीच्या स्तंभ ३ मध्ये, निर्वाचक गणापुढे अनुक्रमे विनिर्दिष्ट केलेली तारीख आणि वेळ संबंधित निर्वाचक गणाच्या बाबतीत नामनिर्देशनपत्राच्या छाननीसाठीची तारीख व वेळ असेल;

क) उक्त अनुसूचीच्या स्तंभ ४ मध्ये, संबंधित निर्वाचक गणापुढे अनुक्रमे विनिर्दिष्ट केलेली ठिकाणे ही, नामनिर्देशनपत्रे सादर करण्याची आणि त्याची छाननी करण्याची ठिकाणे असतील.

ड) उक्त अनुसूचीच्या स्तंभ ५ मध्ये, संबंधित निर्वाचक गणापुढे अनुक्रमे विनिर्दिष्ट केलेली तारीख ही **शहादा** पंचायत समितीसाठी व्यक्तीची पोटनिवडणूक ज्या तारखेस घेण्यात येईल ती तारीख असेल;

इ) उक्त अनुसूचीच्या स्तंभ ६ मध्ये, निर्वाचक गणापुढे अनुक्रमे विनिर्दिष्ट केलेली वेळ ही, ज्यावेळी मतदान घेण्यात येईल ती वेळ असेल;

फ) उक्त अनुसूचीच्या स्तंभ ७ मध्ये निर्वाचक गणापुढे विनिर्दिष्ट केलेली तारीख व वेळ ही, मतमोजणीची तारीख व वेळ असेल;

ग) उक्त अनुसूचीच्या स्तंभ ८ मध्ये, निर्वाचक गणापुढे अनुक्रमे विनिर्दिष्ट केलेली ठिकाणे हीं, मतमोजणीची ठिकाणे असतील.

Scanned with CamScanner

# अनुसूची

| निर्वाचक गणाचे क्र. व नाव | | नामनिर्देशनपत्रे सादर करण्यासाठी शेवटची तारीख व वेळ | नामनिर्देशनपत्र छाननी करण्यासाठी तारीख व वेळ | नामनिर्देशनपत्र सादर करण्याची व त्यांची छाननी करण्याचे ठिकाण | आवश्यकता असेल तर ज्या तारखेस मतदान घेण्यात येईल ती तारीख | ज्या वेळेमध्ये मतदान घेण्यात येईल ती वेळ | मतमोजणीसाठी तारीख व वेळ | मतमोजणी करण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| **तालुका - शहादा** | | | | | | | | |
| ४९ | सुलतानपूर | सोमवार दिनांक ०५/०७/२०२१ सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० पर्यंत ( रविवार दि. ०४/०७/२०२१ रोजी नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात येणार नाहीत.) | मंगळवार दिनांक ०६/०७/२०२१ सकाळी ११.०० वाजल्यापासून | तहसिलदार यांचे दालन, नवीन तहसिल कार्यालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, मोहिदा रोड, शहादा | सोमवार दिनांक १९/०७/२०२१ | सकाळी ७.३० ते ५.३० पर्यंत | मंगळवार दिनांक २०/०७/२०२१ सकाळी १०.०० पासून | सभागृह, नवीन तहसिल कार्यालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, मोहिदा रोड, शहादा |
| ५१ | खेडदिगर | | | | | | | |
| ५३ | मंदाणे | | | | | | | |
| ५८ | डोंगरगांव | | | | | | | |
| ५९ | मोहिदे तह | | | | | | | |
| ६१ | जावदे त.बो. | | | | | | | |
| ६२ | पाडळदे बु. | | | | | | | |
| ६६ | शेल्टी | | | | | | | |

टिप :-

१ राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेले संकेतस्थळ http://panchayatelection.maharashtra.gov.in यावर मंगळवार, दि. २९ जून २०२१ (सकाळी ११.०० ते दु. ३.०० पर्यंत) पासुन सोमवार, दि. ०५ जुलै २०२१ (सकाळी ११.०० ते दु. ३.०० पर्यंत) पर्यंत नामनिर्देशनपत्र भरता येतील.

२ संकेतस्थळावर भरण्यात आलेले नामनिर्देशन पत्र मंगळवार, दिनांक २९ जून २०२१ ते सोमवार, दिनांक ०५ जुलै २०२१( सुटीचे दिवस दिनांक ०४ जुलै २०२१ वगळून ) प्रत्येक कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत निर्वाचन अधिकाऱ्यांकडे स्विकारले जातील.

३ वैध उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक ०६ जुलै २०२१ वार मंगळवार (छाननीनंतर लगेचच)

४ नामनिर्देशन पत्राचा स्विकार करण्याबाबत किंवा ते नामंजुर करण्याबाबत निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने दिलेल्या निर्णयाविरुध्द जिल्हा न्यायाधिशांकडे अपिल करण्याची शेवटची तारीख - शुक्रवार, दि. ०९ जुलै २०२१

५ जिल्हा न्यायाधिशांना अपिलांवर सुनावणी व निकाल देण्याची संभाव्य शेवटची तारीख- सोमवार, दिनांक १२ जुलै २०२१

६ जिल्हा न्यायाधिशांनी अपील निकालात काढल्यावर वैध उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे तारीख - सोमवार, दिनांक १२ जुलै २०२१

७ उमेदवारी मागे घेणे -
अ) (जेथे अपिल नाही तेथे ) - सोमवार, दिनांक १२ जुलै २०२१ (सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० पर्यंत )
ब) (जेथे अपिल आहे तेथे) - बुधवार, दिनांक १४ जुलै २०२१ (सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० पर्यंत )

८ निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे व निशाणी वाटप -
अ) (जेथे अपिल नाही तेथे )- सोमवार, दिनांक १२ जुलै २०२१ (दु. ३.३० नंतर )
ब) (जेथे अपिल आहे तेथे) - बुधवार, दिनांक १४ जुलै २०२१ ( दु. ३.३० नंतर )

९ निवडून आलेल्या सदस्यांची नावे प्रसिध्द करणे - शुक्रवार, दिनांक २३ जुलै २०२१ पर्यंत

ठिकाण :- नंदुरबार
दिनांक :- २९ जून २०२१

( डॉ. राजेंद्र भारुड )
जिल्हाधिकारी नंदुरबार

Scanned with CamScanner